गांवकरी

■ नाशिक, मंगळवार, दि. १ जुलै २०२५

# मयंक जाधवचे नवोदय परीक्षेत यश



**कसबे सुकेणे :** नवोदय पात्रता परीक्षेत मयंक विजय जाधव गुणवत्ता यादीत झळकला. कर्मवीर काकासाहेब वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर येथील गुरुकुल होस्टेलचा तो विद्यार्थी आहे. के. के. वाघ विद्याभवनचे प्राचार्य दिवाकर शेजवळ, माजी प्राचार्य यशवंत ढगे, पर्यवेक्षक सुनीता वडघुले, नवोदय परीक्षाप्रमुख बाजीराव वाघ, राजाराम गांगुर्डे, किरण कदम, क्रीडाशिक्षक गोविंद कांदळकर, मयंकचे पालक विजय जाधव, साकूरपाडा येथील सरपंच शशिकांत बागूल आणि विद्याभवनाच्या शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले.

दैनिक लोकनामा

नाशिक, मंगळवार, १ जुलै २०२५

www.eloknama.com

## महत्त्वाचे



# मयंक जाधवचे नवोदय पात्रता परीक्षेत यश

**कसबे सुकेणे :** नवोदय पात्रता परीक्षेत गुणवंत विद्यार्थी मयंक विजय जाधव हा कर्मवीर काकासाहेब वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेबनगर येथील गुरुकुल हॉस्टेलचा विद्यार्थी नवोदय पात्रता परीक्षेत घेण्यात आलेल्या ८० विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता यादीत झळकला. के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ यांनी त्याचे कौतुक केले. त्याच्या पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी के. के. वाघ विद्याभवनचे प्राचार्य दिवाकर शेजवळ, माजी प्राचार्य यशवंत ढगे, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, नवोदय परीक्षाप्रमुख बाजीराव वाघ, राजाराम गांगुर्डे, किरण कदम, क्रीडा शिक्षक गोविंद कांदळकर, मयंकचे पालक विजय जाधव, साकूरपाडा येथील सरपंच शशिकांत बागूल आणि विद्याभवनाचे सर्व शिक्षक यांनी त्याचे अभिनंदन केले.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
19 Jul 2025 - Page 5-Niphad

थोडक्यात...

# वृक्षारोपण कार्यक्रम

**कसबे सुकेणे।** भा.नगर के.के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेजमध्ये हरित कुंभ संकल्पनेअंतर्गत प्राचार्य दिवाकर शेजवळ यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. माझा कुंभ माझी जबाबदारी, माझा वृक्ष माझी जबाबदारी घोषणा करत प्राचार्य दिवाकर शेजवळ, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, वनपाल एन.एन. गांगोर्डे, वनरक्षक कल्पना पाईकराव, एरियाज फाऊंडेशनचे हेमंत वानले, हरित सेनाप्रमुख गोविंद कांदळकर, शिवाजी जावळे आदींसह राष्ट्रीय हरितसेना विद्यार्थ्यांनी पेरू, जांभूळ, शिसव, डेल्टा, खैर, वड आदींचे सामूहिक वृक्षारोपण केले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक सुनील माळी आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक लोकनामा
नाशिक, बुधवार, २ जुलै २०२५
www.eloknama.com



## विद्या भवन येथे वृक्षारोपण

**कसबे सुकेणे :** के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज भाऊसाहेबनगर येथे हरित महाराष्ट्र व समृद्ध महाराष्ट्र हा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने विद्याभवनमध्ये आज वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. विद्याभवनचे प्राचार्य दिवाकर शेजवळ यांच्या हस्ते व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिमंडळ अधिकारी एन. एन. गांगोडे, वनरक्षक कल्पना पाईकराव, विद्याभवनचे शिक्षक शिवाजी जावळे, शिक्षिका शारदा मोरे तसेच इतर शिक्षक व हरित सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.



# बाल वारकरी ग्रंथदिंडी

**कसबे सुकेणे** : आषाढी एकादशीनिमित्त कर्मवीर काकासाहेब वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर येथे विद्याभावनाचे प्राचार्य दिवाकर शेजवळ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या पर्यवेक्षिका तसेच भाऊसाहेबनगर पतसंस्थेच्या संचालिका सुनीता वडघुले, ज्येष्ठ शिक्षक आर. डी. गांगुर्डे, स्काउटप्रमुख मनोज तुसे, चंद्रकांत गंगावणे, क्रीडा विभागप्रमुख गोविंद कांदळकर, माया पवार शारदा मोरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी विद्याभानाचे प्राचार्य शेजवळ तसेच पर्यवेक्षिका वडघुले यांनी विद्यार्थ्यांना एकादशीनिमित्त मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अभंग, गवळणी गायल्या तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथदिंडी काढण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा बोंबले यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी क्रीडा विभागप्रमुख गोविंद कांदळकर, शिवाजी जावळे, अनिल शिंगणकर यांनी परिश्रम घेतले.

गांवकरी

■ नाशिक, गुरुवार, दि. १७ जुलै २०२५

# के. के. वाघ विद्याभवनात शून्य सर्पदंश जनजागृती अभियान

**कसबे सुकेणे :** के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेबनगर येथे राष्ट्रीय हरितसेना, स्काउट विभाग, एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वनविभाग नाशिक व एरियाज फाउंडेशनतर्फे शून्य सर्पदंश जनजागृती अभियान कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेबनगरचे प्राचार्य दिवाकर शेजवळ होते. प्रमुख अतिथी पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, प्रमुख मार्गदर्शक रियाज फाउंडेशनचे संचालक सुशांत रणशूर, संचालक हेमंत वानले, सदस्य राजेश शेजवळ, सचिन नागरे, तर विद्याभवनाचे ज्येष्ठ शिक्षक प्रवीण रणदिवे, डी. के. मोरे, मनोज तुसे, संजय धनगर, संदीप खिस्ते, हरित सेनाप्रमुख गोविंद कांदळकर आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक सुशांत रणशूर यांनी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शून्य सर्पदंश जनजागृती अभियानांतर्गत जनजागृती करताना, विषारी सर्प कोणते? बिनविषारी सर्प कोणते? तसेच सर्पदंश झाल्यावर काय करावे? सर्पदंश कसे टाळावेत? याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. हरितसेनाप्रमुख गोविंद कांदळकर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
17 Jul 2025 - Page 7-Niphad

# सर्पदंश जनजागृती

**कसबे सुकेणे ।** भा.नगर येथील के.के. वाघ विद्याभवनमध्ये राष्ट्रीय हरितसेना, स्काऊट विभाग, एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाशिक वनविभाग एरियाज फाऊंडेशनतर्फे 'शून्य सर्पदंश जनजागृती अभियान' कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दिवाकर शेजवळ तर प्रमुख अतिथी पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, रियाज फाऊंडेशन संचालक सुशांत रणशूर, संचालक हेमंत वानले, सदस्य राजेश शेजवळ, सचिन नागरे तर ज्येष्ठ शिक्षक प्रवीण रणदिवे, डी.के. मोरे, मनोज तुसे, संजय धनगर, संदीप खिस्ते, हरितसेनाप्रमुख गोविंद कांदळकर आदी उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक सुशांत रणशूर यांनी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शून्य सर्पदंश जनजागृती अभियानाअंतर्गत जनजागृती करताना विषारी सर्प कोणते? बिनविषारी सर्प कोणते? याचे मार्गदर्शन केले.

# वाघ विद्याभवनात शून्य सर्पदंश जनजागृती

**कसबे सुकेणे :** के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज



भाऊसाहेब नगर येथे राष्ट्रीय हरितसेना, स्काऊट, विभाग, एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वनविभाग नाशिक व एरियाज फाउंडेशनतर्फे 'शून्य सर्पदंश जनजागृती अभियान' कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दिवाकर शेजवळ तर प्रमुख अतिथी पर्यवेक्षिका सुनिता वडघुले प्रमुख मार्गदर्शक रियाज फाउंडेशनचे संचालक सुशांत रणशूर, संचालक हेमंत वानले, सदस्य राजेश शेजवळ, सचिन नागरे, विद्याभवनाचे ज्येष्ठ शिक्षक प्रवीण रणदिवे, डी.के.मोरे,मनोज तुसे, संजय धनगर, संदीप खिस्ते, हरित सेना प्रमुख गोविंद कांदळकर आदी उपस्थित होते. प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक सुशांत रणशूर यांनी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शून्य सर्पदंश जनजागृती अभियानांतर्गत जनजागृती करतांना, विषारी सर्प कोणते? बिनविषारी सर्प कोणते? तसेच सर्पदंश झाल्यावर काय करावे? सर्पदंश कसे टाळावेत? याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन गोविंद कांदळकर यांनी केले.

दैनिक लोकनामा

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
22 Jul 2025 - Page 7-Niphad

# विद्यार्थी गुणगौरव



**कसबे सुकेणे। वार्ताहर**

भाऊसाहेबनगर येथील के.के. वाघ विद्याभवनात १२ वी २०२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संस्था जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांच्या हस्ते झाला.

एच.एस.सी. २०२५ परीक्षेत भाऊसाहेबनगर केंद्रात प्रथम आलेल्या विज्ञान शाखेतील साहिल खांदवे (८७.३३) व सी.इ.टी. परीक्षेत (९८.८३) गुण मिळाले. द्वितीय साक्षी भंडारे व सानिका झाल्टे (८४.१७) तर समृद्धी मोगरे (८२.१७) तृतीय आली. कला शाखेत साक्षी आंबेकर (७५.१७) प्रथम, प्राची घोलप द्वितीय तर तनुजा साळवे तृतीय आली. किमान कौशल्य विभागात समीर गायकवाड प्रथम तर प्रियांका भोई द्वितीय आली. प्राचार्य दिवाकर शेजवळ अध्यक्षस्थानी होते. विभागप्रमुख प्रा.बस्तीराम रानडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य यशवंत ढगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी माजी प्राचार्य अशोक बस्ते, मुख्याध्यापिका उज्वला तासकर, मुख्याध्यापिका संगीता नाईक, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, गणेश टर्ले आदींसह प्राध्यापक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. आनंदी हिंगमिरे हिने सूत्रसंचालन तर रेणूका गायकवाड हिने गौरवपत्राचे वाचन केले.

गांवकरी
■ नाशिक, सोमवार, दि. २८ जुलै २०२५

# के. के. वाघ विद्याभवनात कारगिल विजय दिन

**कसबे सुकेणे :** के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज भाऊसाहेबनगर येथे काल कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्याभवनात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभवनचे प्राचार्य दिवाकर शेजवळ होते. विद्यालयात अमर जवान ज्योत प्रज्वलित करून कारगिल युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना अभिवादन करण्यात आले. विद्यालयातील एन.सी.सी. स्काउट व हरित सेना यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, राजाराम गांगुर्डे, स्काउट प्रमुख मनोज तुसे, राजेंद्र उगले, एन.सी.सी. विभागप्रमुख धनंजय मोरे, चंद्रकांत गंगावणे, प्रवीण रणदिवे, क्रीडाप्रमुख गोविंद कांदळकर, संजय धनगर, संदीप खिस्ते आदी उपस्थित होते.

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
28 Jul 2025 - Page 5-Niphad

थोडक्यात...

# कारगिल विजय दिवस

**कसबे सुकेणे ।** भाऊसाहेबनगर के.के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेजमध्ये कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्ष्यस्थानी प्राचार्य दिवाकर शेजवळ होते. विद्यालयात अमर जवान ज्योत प्रज्वलीत करून कारगिल युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना अभिवादन करण्यात आले. एन.सी. सी स्काऊट व हरित सेना यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, राजाराम गांगुर्डे, स्काऊट प्रमुख मनोज तुसे, राजेंद्र उगले, एन.सी.सी विभागप्रमुख धनंजय मोरे, चंद्रकांत गंगावणे, प्रविण रणदिवे, क्रीडाप्रमुख गोविंद कांदळकर उपस्थित होते.